# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 22४/२०२६**

विषय :- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यापीठाशी संबंधीत नसलेल्या व सर्वसाधारणपणे व्यापक/राष्ट्रीय विषयाबाबत निदर्शने/आंदोलन/सभा/मोर्चा आदी कार्यक्रमाच्या धोरणाबाबत...

संदर्भ :- ०१. मा.व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या सभेतील ठराव क्रमांक म : ३६३/२५०८२६,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाशी प्रत्यक्ष निगडीत नसलेल्या राष्ट्रीय पातळीवरचे प्रश्न अथवा इतर व्यापक स्वरुपाच्या विषयाच्या संदर्भात निषेध व्यक्त करण्यासाठी निदर्शने/आंदोलन/सभा/मोर्चा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवाराचा वापर मोठया प्रमाणात होत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अनेक प्रसंगी पोलिस प्रशासनाने अशा निदर्शने/आंदोलन/सभा/मोर्चा यांना विद्यापीठ आवारात परवानगी दिल्याचे देखिल निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या निदर्शने/आंदोलन/सभा/ मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी होणारे निदर्शक/आंदोलक तसेच सदर निदर्शने/आंदोलन/सभ/मोर्चा यासाठी देण्यात आलेली उत्स्फुर्त/अल्प पूर्व सुचना विचारात घेता विद्यापीठ आवारात अनुचित घटना घडण्याची शक्यता, निदर्शने/आंदोलन/सभा/मोर्चाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या शांततामय शैक्षणिक वातावरणात निर्माण होणारा अडथळा, विद्यापीठाच्या मालमत्तेचे होणारे नुकसान, व्यवस्थेवर येणारा अकारण ताण व आवारात राहणाऱ्या आणि शिकणाऱ्या विद्यार्थी / शिक्षक यांना सर्व शैक्षणिक प्रक्रियेत निर्माण होणारी बाधा विचारात घेऊन अशा प्रकारच्या निदर्शने/आंदोलन/सभा/मोर्चा यांस व विविध राजकीय पक्ष/संघटना/गट व या विषयाशी संबंधीत इतर सर्व व्यक्ती/संघटना यांस यापुढे विद्यापीठ आवारात परवानगी देण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे,

(प्रा.(डॉ.) प्रफुल्ल पवार)
**प्रभारी कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जा.क्र. : सु.वि./३३४/२०२६,**
**दिनांक :- १४/१०/२०२६**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

०१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
०२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
०३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
०४. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
०५. मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामिण, पुणे.
०६. मा. पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर, पुणे.
०७. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे.
०८. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, } सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही
०९. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग } विनंती.
१०. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
११. मा. संचालक, सुरक्षा विभाग, सा.फु.पु.वि. पुणे.
१२. मा. अध्यक्ष/सचिव, सर्व संबंधीत संघटना,
१३. मा. सर्व संबंधीत.

D:\sahadev\circular\Circular Drafting.docx